ISSN : 2229-4996

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ पुरस्कृत

# संशोधन क्षितिज

## वार्षिकांक
## २०१८





संपादक

डॉ. अजय कुळकर्णी डॉ. राजेंद्र वाटाणे

डॉ. अंजली जोशी

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

# अनुक्रमणिका


१. नगरधन येथील वाकाटकांचा अपूर्ण ताम्रपट १

डॉ. अभिजित दांडेकर, डॉ. विराग सोनटक्के, श्रीकांत गणवीर, शंतनू वैद्य

२. लिंब, जिल्हा सातारा, येथील पुरातत्वीय उत्खनन २०१६-२०१७ ५

डॉ. अमित पेंदाम आणि डॉ. अनिता आगाशे

३. आर्य आक्रमणाची थाप! १०

डॉ. परीक्षित स. शेवडे

४. कान्हेरीचा लोकाश्रय १२

डॉ. सुरज अ. पंडित.

५. चास गावातील प्राचीन अवशेषांचा अभ्यास १९

डॉ. मंजिरी भालेराव

६. शार्दूलेश्वर टेकडी, नरनाळा २२

अशोक रा. टेमझरे

७. वेरूळचा इंद्रा-विष्णू ३३

डॉ. किरण देशमुख

८. चतुर्विंशती विष्णूच्या शक्ती ३६

डॉ. गो. बं. देगलूरकर

९. विदर्भातील एक विलक्षण कलाकृती : 'प्रज्ञापारमिताः' ४२

डॉ. शेषशयन देशमुख

१०. शिवनटेश ४४

डॉ. कुमुद कानिटकर

११. ढेलू : कामतत्त्वाचा प्रतिनिधी : एक लोकदेव ४७

डॉ. मधुकर वाकोडे

१२. गढ़ा-मंडलाचे गोंड राज्य : अधिपत्यासाठी पेशवे-भोसले कलह ५५

केशव कमाविसदार

१३. उदेपुरी महंताचे बयान ६४

डॉ. प्रभाकर गद्रे

१४. लिंगोपंत उर्फ आबा दीक्षित (चंद्रपुरातील एक विद्वान) ७१
दत्ता तन्नीरवार

१५. बाणदारखाना ते नवी शुक्रवारीपर्यंत ७९
डॉ. चंद्रशेखर गुप्ता

१६. नागपुरकर भोसलेंचा काल आणि सांस्कृतिक जीवन ८३
डॉ. भालचंद्र अंधारे

१७. विदर्भातील संतांचे चरित्रकार १०७
डॉ. राजेंद्र डोळके

१८. वारकरी संप्रदाय व पाशुपत शैव ९७
डॉ. मधुकर जोशी

१९. निमित्त 'पांडुरंग कांती...' या अभंगाचे ९९
डॉ. मदन कुलकर्णी

२०. नागपुरातील संगीत विश्व १०३
डॉ. मोहना मार्डीकर

२१. महाराष्ट्राची शौर्यगाथा गाणारा काव्यप्रकार : पोवाडा १०८
डॉ. राजेंद्र वाटाणे

२२. दंडार लोकनाट्यातील 'लावणी' ११५
डॉ. मधुकर नंदनवार

२३. श्रेष्ठ कवी ग. दि. माडगूळकर १२५
डॉ. रेखा जगनाळे-मोतेवार

२४. 'संशोधन महर्षी' - डॉ. वासुदेव विष्णू मिराशी १२८
डॉ. रश्मी चौधरी-वाटाणे

- काही बातम्या १३१
- मासिक संगोष्ठी वृत्तांत १३४
- ज्येष्ठ मान्यवरांच्या व अभ्यासकांच्या भेटी १३६
- वार्षिक अहवाल - डॉ. राजेंद्र वाटाणे (सचिव) १३८
- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई पुरस्कारार्थ दिलेले मानपत्र १४१

# २२. दंडार लोकनाट्यातील 'लावणी'

– डॉ. मधुकर वि. नंदनवार
मराठी विभागप्रमुख, कला वाणिज्य महाविद्यालय, उमरेड
भ्रमणध्वनी : ९४२३६३४०१५

**दंडारीतील गण :**

दंडार हा ग्रामीण जनजीवनाचा धर्मविधी आणि लोकरंजनाचा एक महत्त्वाचा लोकनाट्य प्रकार आहे. दंडार लोकनाट्यात लावणीला विशेष प्राध्यान्य असते. लावणीशिवाय दंडार लोकनाट्याला महत्त्व उरत नाही. म्हणजेच लावणीशिवाय दंडारीची कल्पनाच करता येत नाही. या दंडारीतील लावणीचा मागोवा घेत असताना सुरुवात गणाने होते. दंडार लोकनाट्य सादर होताना पूर्वरंगात गणाला अतिशय महत्त्व आहे. योजलेले कार्य पूर्ण व्हावे, त्या कार्यात अडथळा किंवा अरिष्ठ येऊ नये, मंगलकार्य निर्विघ्न पार पडावे म्हणून कार्यारंभी वेगवेगळ्या देवदेवतांची पूजा, त्याचे स्तवन करण्याची प्रथा प्राचीन आहे. या परंपरेतूनच गण दंडारीत आला असावा म्हणूनच पूर्वरंगात गण गायला जातो. गणपतीची स्तुती करण्याकरिता गायले जाणारे गीत म्हणजे गण होय'' अशी गणाची व्याख्या करता येईल. दंडार लोकनाट्यात दंडारीचा दर्शनी पडदा उघडण्यापूर्वी नर्तक हात जोडून गण गातात.

*गण (आतून) – भर गुरुनाथ गणपती, सारजा सती, देई मजमती।*
*की गौरी तनया–आधी साजन पुजन करितो तुझे*
*गणू राया जी ।।धृ. ।।*

असे आतून गण गाऊन गणेशाला आशीर्वाद मागीतला जातो. दंडारीतील कलावंत आधी गण हात जोडून व ऊभे राहून गात असत. आजच्या दंडारीत गण नाचून सादर करतात. गण पडछ्याबाहेर येऊन म्हटल्या जातो –

बाहेरून – *नमन माझे गणराया। रामराया राघोबाजी ।।धृ. ।।*
*एकदंत चक्रभूजा। सवे घेऊन सारजा ।।*
*अजी सारजा ये रंगनी। सारजा ब्रह्माची कुवरी।*
*नारद तुंबर संगिता। रंगनी नाचे एकदंता ।।*

गण गाऊन झाल्यावर गणपतीची पूजा करून दंडारीच्या कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने सुरूवात होते. ती प्रार्थनाच असते. एकेक कडी एकेक देवतेकरिता वापरून एकाच पदात अनेक देवतांना नमस्कार करण्याची युक्ती दंडारीने 'नमस्कार' या छंदात साधली आहे. दंडार लोकनाट्यात गायल्या जाणारा नमस्कार –

*पहिला नमस्कार असावे माझा भगवंत परमेश्वर*
*करावे मजवर प्रेम हा जी ।।१।।*
*दुसरे नमस्कार धरती माते उभा मी तुझ्यावर*
*माझा अन्याय पदरी धर ।।२।।*
*तिसरे नमस्कार शिवशंकर सतीचे कुवर।*
*ब्रह्मा अज्ञानाचे घर जी ।।३।।*
*चवथे नमस्कार गुरु वस्ताद तोच माझा पिता।*
*तयाने ज्ञान दिला होता जी ।।४।।*
*पाचवे नमस्कार पाच पांडव कौरव झाले थोर।*
*माता कुंती द्रौपदी नार ।।५।।*

नमस्कार आटोपल्यानंतर 'विनंती' गाण्याची प्रथा आहे. नमस्कारप्रमाणेच वेगवेगळ्या देवतांना विनविण्याचे कार्य 'विनंती' हा छंद पार पाडीत असतो.

*हे पहिली विनंती माझी आदास्याच्या गणपतीला ।।*
*हे दुसरी विनंती माझी माता सर्वसतीला ।।*
*हे तिसरी विनंती माझी त्या भोळ्या शंकराला ।।*
*हे चवथी विनंती माझी चारही वेदाला ।।*
*हे पाचवी विनंती माझी त्या पाची पांडवाला ।।*
*हे सहावी विनंती माझी त्या साही शास्त्राला ।।*

वरील विनंतीवरून नमस्कारात उल्लेख केलेल्या सर्वच देवतांना स्थान मिळाले आहे हे दिसून येते. विनंतीचे निरीक्षण केल्यास पदाच्या रचनाकाराला भारतीय तत्त्वज्ञानाचे ज्ञान असल्याचे सिद्ध होते. नवनाथ, दहा अवतार, अकरा रुद्र, बारा लिंगे, चवदा भवने, पंधरा तीर्थे, सोळा स्वर्ग इत्यादीचे विनंतीत असलेले उल्लेख निश्चितच ग्रामीण प्रतिभेच्या अध्ययन क्षमतेची व बहुश्रुततेची आपल्याला ग्वाही देतात.

## दंडार लोकनाट्यातील लावणी

मराठी माणसाच्या मनाला चटका लावणारी व सरळ हृदयात जाऊन भिडणारी लावणी मराठी मातीतून जन्माला आलेले लावण्यमयी लेणे आहे. लावणीचा विशेष गुणधर्म श्रृंगार असतो. तमाशातील लावणीने श्रृंगारासोबत अध्यात्माचे धडे दिलेत असे दिसते. दंडारीतील लावणी उपेक्षित राहिलेली असून याच लावणीचे महत्त्व व अभिजातता ग्रामीणांच्या मनांचा आजही ठाव घेते.

**दंडारीतील लावणीचे विषयावरून वर्गीकरण :**

दंडारीच्या लावणीत वेगवेगळे विषय वर्णिले जातात लावणीतील वर्णनावरूनही तिचे दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते.

(१) शृंगारिक लावणी, (२) सात्विक लावणी

**(१) शृंगारिक लावणी किंवा शिनगारी लावणी :** ज्या लावणीत शृंगाराचे वर्णन

केलेले असते अशा लावणीला शृंगारिक लावणी असे म्हणतात. लावण्य हा शृंगाराचा स्थायी भाव आहे. दंडारीत या लावणीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. 'लावणी' हा शब्द कानावर पडताच शृंगाराची आठवण दंडारीच्या लावणीच्या बाबतीत होते, हे विशेष. तमाशातील लावणीने शृंगाराला महत्त्व दिल्यामुळे शृंगाार लावणीचा स्थायीभाव मानल्या गेला तोच दंडारीतील लावणीत आहे.

**शृंगारिक** लावणीचे तीन भागात वर्गीकरण केले जाते.

(अ) पाखंडी लावणी, (ब) लस्करी लावणी, (क) सिनगारी लावणी

**(अ) पाखंडी लावणी :** शृंगारिक लावणीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शृंगार होय. वर्णन करण्याच्या पद्धतीवरून ह्या लावणी प्रकाराला शृंगारिक लावणी म्हटल्या जाते. शृंगारिक लावणीच्या तीन प्रकारचे वर्णन करताना पहिल्या पाखंडी लावणीचा विचार करावा लागतो. या पाखंडी लावणीत स्त्री देहाचे भडक वर्णन केलेले असते. ही लावणी अश्लिलतेकडे झुकलेली असून ह्या लावणीत उत्तान व भडक शृंगार चित्रित केलेला असतो.

*"तुझी चाल दिसे नटखट, हाले मनगट*
*सांग दोन गोष्टी*
*तुला देतो खोबऱ्याची वाटी*
*नारी गरजेसाठी हो. जी... जी*

**(ब) लस्करी लावणी :** दंडारीतील शृंगारिक लावणीचा दुसरा प्रकार 'लस्करी' लावणी म्हणून विशेष प्रचलीत आहे. 'लस्कर' म्हणजे सैन्य. या लावणी प्रकारचा बोध होतो. एखाद्या स्त्रीचा प्रियकर किंवा जीवलग लस्करात किंवा सैन्यात गेला असताना त्याच्या विरहात तळमळणाऱ्या प्रेयसीची आतुरता ज्या लावणीत वर्णन केलेली असते तिला लस्करी लावणी म्हणतात.

*पती गेले लस्करात माझे परदेशा बाई।*
*रात्र जाते वैऱ्याशीन मला झोप येत नाही।*
*सुकला सर्व बाग बगीचा सुकली जाई जुई।*
*सुकला सर्व फुल बगीचा स्वास येत नाही।*
*बालपणामध्ये लग्न केला आईबापानं।*
*आजवरी होते लहान मजला कळत नव्हते ज्ञान।*
*लवकर पाठवा पत्र पतीला आणा बोलावून।*
*अशा गं वाणी चौघे शिपाई आले चालून।*
*पती गेले लस्करात माझे परदेशा बाई।।*

**(क) सिनगारी लावणी (श्रृंगारिक लावणी) :** श्रृंगारावर भर देणारी लावणी म्हणून सिनगारी लावणी प्रसिद्ध आहे. नावाप्रमाणेच सिनगाराने सजलेली लावणी साज श्रृंगाराने नटलेली असते. या लावणी प्रकारात सभ्येतच्या मर्यादा सांभाळून श्रृंगार केल्यामुळे पाखंडी लावणीप्रमाणे अश्लिलता व भडक वर्णनाचा अभाव जाणवतो.

*"नवतीचा बाळ ठेंगणा, कुणाची मैना? कुणाचा राघु जी?*
*नार चालली पाण्याला घेवून घागर*
*दोर टाकला अडात, राघवा जी ।।१ ।।*
*दोर टाकला अडात, फिरे चौफेर*
*मला गरगर गिरणी आली, राघवा जी ।।२ ।।*

**(२) सात्विक लावणी :** ज्या लावणीत शृंगाराव्यतिरिक्त इतर भावभावनांचे वर्णन केलेले असते अशी लावणी सात्विक लावणी म्हणून ओळखली जाते.

लोकांच्या भावना, लोकांच्या शब्दांत लोकांसाठी मांडणारे शाहीर हे लोककवी ठरले. दंडारीतील लावणीची रचना फार पूर्वीपासून शाहिरांनी केली परंतु त्यांची दखल ही कागदोपत्री घेतली गेली नाही. त्यांचे काव्य मौखिक व परंपरेने पुढे आले. काही अल्पशिक्षित लोककवींनी बाडात बंदिस्त केले. परंपरेने मौखिक लावण्या दंडारीत गायल्या जात असताना स्त्रीदेहाचे भडक वर्णन व अश्लिलता येणे क्रमप्राप्त होते. त्या निःसंकोचपणे गायल्या जायच्या. काळानुरूप व जनतेचा विचार करून त्या संकोचापायी केवळ पोथ्यामधये दडलेल्या आहेत. शृंगारिक, भडक व अश्लिल लावणीची जागा सात्विक लावणीने घेतलेली दिसते.

**सात्विक लावणीचे सहा प्रकारात वर्गीकर केले जाते.**

| | | |
|---|---|---|
| (अ) रामायणी लावणी | (ब) इतिहासिक लावणी | (क) गतकालीन लावणी |
| (ड) पंढरपुरी लावणी | (ई) सामाजिक लावणी | (फ) राष्ट्रीय लावणी |

**(अ) रामायणी लावणी :** दंडारीतील लावण्यामध्ये पौराणिक विषयावरील लावणीची संख्या सर्वाधिक आढळते. पौराणिक विषयाचा विचार करता दंडारीत गायल्या जाणाऱ्या लावण्यामध्ये रामायणातील कथाभागावर आधारित लावणीची संख्या जास्त असल्याने जाणवते. रामायणातील विविध प्रसंगाचे वर्णन करणारी लावणी रामायणी लावणी होय. रामायणी लावणीत प्रामुख्याने रामजन्मापासून तर लवांकुश आख्यानांपर्यंत यच्चयावत प्रसंग दंडारीतील लावणीत वर्णन केलेले असतात.

रामजन्माची लावणी खालीलप्रमाणे –

*सुर्यकुलामध्ये राजा दशरथ मोठा पुण्यवान ।।*
*त्याच्या उदरी अवतार झाले राम लक्ष्मण ।। जी*
*विश्वेशस्वराचा पुत्र महाबळी होता रावण ।।*
*केला गर्व रावणाने मनासी आणला अभिमान ।। जी*
*चवदा चवकुळ्या राज्य करतो शंकर कृपेने ।।*
*तेहतीस कोटी देवी देवता घरी बंदीवान जी ।।*
*रावण बहूत मातला चिंता पडली देवाला ।।*
*त्याचेसाठी अवतार देवाने घेतला अयोध्येला ।।*

**(ब) ऐतिहासिक लावणी :** "ज्या लावणीत महाभारतातील प्रसंगाचे वर्णन रेखाटलेले असते त्या लावणीला ऐतिहासिक लावणी" असे म्हणतात.

महाभारताला 'जय नावाचा इतिहास' असे संबोधल्या जाते. त्याची आठवण या ऐतिहासिक लावणीच्या संदर्भात होताना दिसते. 'कालीया मर्दन' या सुप्रसिद्ध कथानकावरित लावणीचा निर्देश–

*बाळकृष्ण खेळतो चेंडू पद्म पाताला।*
*चेंडूवासी रत्न, हिरे खेळ मांडिला।।टेक।।*
*हाती चेंडू, दांडू बळीरामाने धरिला।*
*चेंडूवासी हा टोला बळिरामाने दिला।।१।।*
*तो गरगर फिरता चेंडू दाराशी आला।।२।।*

वरिल ऐतिहासिक लावणी महाभारतातील प्रसंग सादर करीत असते.

**(क) गतकालीन लावणी :** इतिहासात घडलेला प्रसंग रेखाटणारी लावणी ऐतिहासिक लावणी होय. परंतु महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर असणाऱ्या भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील बोलीने महाभारतातील प्रसंगाना स्थान दिल्यामुळे महाभारतानंतरचा सारा इतिहास 'गतकालीन लावणीत' येतो.

या गतकालीन लावणीत पेशवाईतील घटना, शिवाजी महाराजाचे कर्तृत्व, स्वातंत्र्यपूर्व काळातील घटना, टिळकांना झालेली शिक्षा, गांधीजीची चळवळ या बाबीचा समावेश करता येईल.

*"श्रीमंत महाराज भूषिले*
*पूर्णचंद्र झाला*
*खडा बोले बालाजीचा,*
*मुजरा माझा रघुजी इंद्राला।।टेक।।*
*बर्डीवरून तोफ डागली,*
*इंग्रज हो आला*
*तोफ काढुनी सलामी दिली,*
*बत्ती दिली तोफेला।।१।।*
*बाबा साहेब गुजर आपुले,*
*लुकत लुकत आले अंबारी*
*लखलखत हौद जळिताचा,*
*श्रीमंताची कुळ स्वारी।।२।।*

स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांकडून भारतात झालेल्या सुधारणा विशेषतः रेल्वे गाडीची सुरुवात केली गेली. त्या घटनेचे वर्णन वरील लावणीत आलेले आहे.

**(ड) पंढरपुरी लावणी :** पंढरपूर, विठ्ठल व विठ्ठलाचे भक्त यांचे वर्णन ज्या लावणीत केले जाते ती लावणी पंढरपुरी लावणी म्हणून जिल्ह्यातील ग्रामीणात प्रसिद्ध आहे. पंढरपूरचा विठ्ठलाचा महिमा गाण्याव्यतिरिक्त अनेक संताच्या चरित्राचे प्रसंग रंगवण्यावर पंढरपूरी लावणीचा भर असतो. जनाबाईचे दळण देवाने दळणे, चोखोबाची करूण कथा, संत गोरा कुंभाराच्या पायी

त्याचे मूल तुडविले जाणे, दामाजीचे कर्ज देवाने फेडणे, एकनाथाच्या वाड्यात श्रीखंड्या बनून देवाने घरकामे करणे असे प्रसंग वर्णन करून ग्रामीण लोककलावंतानी प्रेक्षकांच्या डोळ्यात आसवांच्या धारा लावल्या आहेत. पंढरपुरी लावणीचे उदाहरण 'सावळा पाहिला डोळा' या लावणीचे देता येईल.

*''सावळा पाहिला डोळा उभा विटेवरी*
*या पंढरपुरी, वैकुंठ नांदे श्रीहरी ।।*
*देव भक्ताचा भुकेला, भक्ती केली काय?*
*त्या नामदेवासाठी मेली उठविली गाय।*
*देव दामाजी पंतासाठी महार होय।*
*त्या मिराबाईचे चरण वंदून जाय।*
*या कोणे येके दिसी मिळाला गाईचा थुंग*
*तू कोणे येके दिसी सांग पांडूरंग।*
*हे तुझे गुण वर्णिता शिणले च्यारी वेद।।१ ।।*

**(ई) सामाजिक लावणी :** ''ज्या लावणीत सामाजिक स्तरावरील विषय, प्रसंग, घटना यांचे हुबेहुब चित्रण रेखाटलेले असते त्या लावणीला सामाजिक लावणी असे म्हणतात.'' इतर सर्व लावणी प्रकाराहून वेगळा व विस्तृत असा सामाजिक लावणी प्रकार होय. आपल्या सभोवताल पसरलेले अज्ञान, अंधश्रद्धा, दैन्य यांच्यावर आघात करण्याचे कार्य करताना ही लावणी दारूबंदी व हुंडाबंदीसारखे विषय अलगदपणे साकार करते. सामाजिक लाावणीतून एका निपुत्रिक वांझोट्या विवाहितेची मनोव्यथा 'वांझोटीची लावणी' या लावणीतून साकार होताना दिसते.

*पोटी पुत्र नाही वांझ किती दिवस राहू?*
*दैवात नाही माझ्या, बोल कोणावर ठेवू? ।।टेक।।*
*मी नवस बहु केले, कोण्या देवाजवळ जाऊ?*
*नाही पावत मला ग देव, जिव कशाला देऊ?*
*बारा महीने पत मी केली, औषधी किती मी घेऊ? ।।१ ।।*
*तरी गर्भ राहेना, कोण्या वैद्यला पाहू?*
*सारा गाव वांझोटी म्हनते, कोठे पळून जाऊ?*
*आया माया खिजवती, लपून किती दिवस राहू? ।।२ ।।*

**(फ) राष्ट्रीय लावणी :** ''जी लावणी राज्य व राष्ट्रीय स्तरावरील विषय सामाजिक प्रश्नाचे भान ठेवून साकार करते तिला राष्ट्रीय लावणी'' म्हणता येईल. कारण सामाजिक प्रश्न व राष्ट्रीय प्रश्नांची इतकी सरमिसळ झालेली आहे की, ते वेगळे करताच येत नाही. कुटुंबकल्याण, अंधश्रद्धा निर्मूलन, प्रौढशिक्षण, स्वच्छता अभियान, शेतकऱ्याच्या आत्महत्या तसेच राष्ट्रीय स्तरावरील वेगवेगळे राजकीय व राष्ट्रीय पक्ष इ. विषय ही राष्ट्रीय लावणी सादर करते. नव्या युगावर व लोकशाहीतील विविध राजकीय पक्षावर कोरडे ओढून राष्ट्रीय स्तरावर मोलाची भर टाकली आहे –

*आया झुटे का जमाना भैया कैसा करना।*
*आया झुटे का जमाना भैया कैसे करना।।धृ.।।*
*मज्जीदगे का काजीमुल्ला, देवल का पुजारी।*
*माला जपने छोड दिया है देखे नर नारी।*
*मन मे बसीयो काम ना भैया कैसा करना। आया झुटे... ।।१।।*

आजच्या नव युगात मंदिर, मज्जीद सारख्या स्थानांनाही कलंक लावण्याचे काम पुजारी, मुल्लाने केल्याचे परिचित आहेच. विविध राष्ट्रीय पक्षातील हेवेदावे व वेगळे पक्ष आणि त्यांची नेतेमंडळी नागरिकांच्या भरोश्यावर निवडून येतात, त्यांनाच विसरतात ही ज्वलंत खंत लोककवी या राष्ट्रीय लावणीतून व्यक्त करताना राजकारणी लोकांपासून सावध राहण्याचा सल्लाही देतात.

**दंडार लोकनाट्यातील वास्तव स्थितीचे वर्णन :**

लोकनाट्याचा विचार करता असे दिसते की, अतिरंजितता व अतिशयोक्ती लोकनाट्यात येत असते. भंडारा व गोंदिया जिल्ह्यात सादर होणाऱ्या दंडार लोकनाट्यात त्या बाबीचा समावेश होत असतो. असे असले तरी दंडार लोकनाट्याने वास्तवाकडे अजिबात पाठ फिरवली नाही. केवळ पौराणिक कथानकाच्या मागे न लागता दंडार लोकनाट्यात सामाजिक समस्यावरील लावण्या, पोवाडे व झडल्या रचल्याचे दिसून येते. विशेषतः तत्कालीन घटनापासून दंडार लोकनाट्य कधीच अलिप्त राहिले नाही.

आपल्या सभोवताली ज्या घटना घडतात अशा घटनांचे पडसाद दंडारीत पडल्याचे दिसून येते. दंडारीत समाजिक जाणविचा वसा सांभाळीत तातडीने काही गोष्टीचा स्वीकार केला आहे असे आढळते.

वास्तवाचे भान ठेवून तत्कालीन घटनावर आधारित आधुनिक युगातील तथाकथित घडमोडींचा उल्लेख असणाऱ्या लावण्या, पोवाडे लोककवीनी रचल्याचे काही बाडामध्ये दिसून आले. त्याचे संकलन करून वेगवेगळ्या शीर्षकाखाली वर्गीकरण करता येते.

**सण उत्सवावर आधारलेली सिनगारी लावणी :**

संकलित लावणीचे उदाहरण –

*सण शिमग्याचा आला नारीने शिनगार केला।।*
*घागर चुंबर घेवून सुंदर नार गेली पाण्याला।।....*

शिमग्याच्या सणाला नारीने श्रृंगार करून विहिरीवर पाणी भरायला जाणे व खूप दिवसांनी तिचा प्रियकर भेटणे, धसमुसळेपणातून तिची चोळी फाटणे, तिने सासुला आपण रानहेल्याच्या भांडणात वाचलो; ही शंकराची कृपा आहे; तुम्ही नारळाचा प्रसाद वाटा, असे सुनेने सांगणे इत्यादी वर्णन या लावणीत येते.

**दैनंदिन घटनेवर आधारित लावण्याही लिहिल्या गेल्या आहेत. उदाहरणार्थ –**

**नर्मदेचा पूर – (नैसर्गिक घटना) २०–१०–१९२६**

दंडारीत 'मंडल्याचा चौक' प्रसिद्ध आहे. मंडला येथे नर्मदा नदीला अचानक महापूर आला. लोकमाता नर्मदेचे हे रौद्र रूपाचे वर्णन करताना ग्रामीण लोककवी म्हणतो –

ऐका श्रोते जन चतूर, ऐका जलक्रीडेचा विस्तार।
नर्मदेशी आला पूर पाण्याचा।
धुडधानी झाली मंडल्याची, कोप गंगेचा। या जीर दाजी रे जी...
सन एकोनविससे। सव्विस साली।
आक्टोंबर तारीख सत्ताविस आली।
सुरु पावसाने झळ लावली। फेर दैवाचा, फेर दैवाचा।
धुडधानी झाली मंडल्याची। कोप गंगेचा, या जी दाजी रे जी...
पाऊस पडतो धुव्वाधार। अंत नाही त्याचा। अंत नाही त्याचा।
आला विना चुकेना भोग कर्माचा। या जीर दाजी रे जी...

**चालबदल** – मनी आनंदली नमर्दा, हासे खदखदा।
मग आली उल्लासात, दनादना खेळे फुगड्या।
ठोके मग उड्या, थडीच्या वर्त।
दुसऱ्या दिवशी, नदी नाले एकच झाले।
पाण्याचा लागेना अंत जी जी...
पांडुरंगा भरली गंगा, आहे गंगा, दोन्ही थळ्या – जी
जिकडे तिकडे पसरले पाणी। अन् रानोवनी।
पाणी आले होते गावात जी जी –
हर हर बोला कैलासवाला, शिवशंकर जी– जी– जी
(संकटाचा धावा)
तू धाव पाव शंकरा, विघ्न हारका जी– जी
कोणी म्हणती धाव पाव अंबीका जी– जी
अन गावाकडे पाहून बोलती केविलवाणी।
शहर दिसती समुद्रावाणी।
पूर पाण्याचा, धुडधानी झाली मंडल्याची
कोप गंगेचा याजीर... दाजी रे जी... (संकलित)

ग्रामीण कवीने केलेले हे लोकमाता नर्मदेचे वर्णन स्वाभाविक वाटते. या रुद्रभीषण प्रसंगाचे रोमहर्षक चित्रण करण्यात कवी यशस्वी झाला. वरील मूळ मंडल्याचे चौक (जलक्रीडेचा हा पोवाडा) ऐकून नैसर्गिक आपत्ती व भीषण परिस्थितीचे दर्शन आपल्याला होते.

**दंडार लावणीतील निसर्ग :**

दंडार या लोकनाट्याने निसर्ग वर्णन करून लावणीत निसर्ग ओतप्रोत भरलेला आहे. झाडीपट्टीचा निसर्ग 'नऊ लाख झाडी, बावन्न लाख वऱ्हाड' या लोकोक्तिवरून स्पष्ट होतो. झाडांचा प्रदेश म्हणून ओळखला जाणारा भंडारा व गोंदिया जिल्हा, या प्रदेशात राहणारा लोककवी आपल्या दंडार लोकनाट्यासाठी निसर्गावर (झाडे) रचना करून ती दंडारीत गायल्याशिवाय कसा

राहणार? १९२७ च्या एका जुन्या बाडात झाडीपट्टीतील विविध वृक्षांचे वर्णन आले असून सामाजिकतेबरोबर राष्ट्रीय ऐक्य निश्चितच जोपासल्याचे दिसते.

*निंब म्हणे, निंबुनी, ऐक माझे उत्तर*
*करूया करंजीचे लग्न, अंजीर आहे वर।*
*अन्यार म्हणे, येरुनी, निरोप धाडा केळीला,*
*सर्व वनस्पती मिळूनी तुम्ही लग्नाला चला ।।१ ।।*
*लग्नाशी चालले वऱ्हाडी, मोगरी ही बाह्मण,*
*नाही मिळे बसाया जागा, गर्दी केली चिलाटीनं ।।२ ।।*
*चिलाटी बसली येऊन, मागे भाराटी आली,*
*हिवर बसला रुसून, खैर पुसते त्याला,*
*पळस, पिंपळ, पापडा मागाहून धावत आला ।।४ ।।*
*सेवंती म्हणे, सिंधी बाई, काहा बसलीस रूसून?*
*खारक म्हणे बदामाला, विघ्न घातला बिब्यानं ।।५ ।।*
*सगूनची तारीफ केला, तू नवरदेव खासा,*
*येन म्हणे धावड्याला, तुम्ही पंगतीला बसा ।।६।।*
*पंगत वाढली बासानं, रुई बोलली बदामाला,*
*असा गोंधळ होऊ लागला, कुडा बाहेर मोहाला ।।७ ।।*
*झिलबुली ऐसी बोलली, बोर काहून नाही आली?*
*बोर झाली बाळीन, ते धुवा गेली ।।८ ।।*
*कुकुडरांजी ऐसी बोलली, टेंभरून नाही आली?*
*टेंभरून नाही आली, ती बाळंतपणा गेली ।।९ ।।* (संकलित)

या लावणीत एक विवाह प्रसंग कल्पून त्याचे वर्णन आजच्या काव्यप्रकारास समकालीन असल्याचे वाटते. विविध जातीचे वृक्ष व समाजातील अनेक जातींचा संबंध दाखवून समाजासमोर एक आदर्श निर्माण करून जातीभेदाची संकल्पना उलगडून दाखविल्याचे स्पष्ट होते. त्यातूनच सामाजिक समता प्रस्तापित झाली आहे.

**नवेगाव बांधची लावणी :**

भंडारा व गोंदिया जिल्हा तलावाचा जिल्हा म्हणून उभ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. त्याचा आकार कासवासारखा असून या दोन्ही जिल्ह्यात तलावांची संख्या भरपूर आहे.

गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव बांध राष्ट्रीय उद्यान म्हणून प्रसिद्ध असून निसर्ग सौंदर्याचे अपार देणे लाभलेला नवेगाव बांध म्हणजे झाडीपट्टीचे भूषण होय. कोलू पाटील या कर्तृत्ववान महापुरुषाची नवेगाव बांध निर्मितीची गौरवगाथा दंडारीने एका लावणीत गायली आहे. हे बांधाचे सत्य लोककवी साकार करताना–

*नवेगाव बांध आहे गुलजार की रस्ता वाहे*
*गावाच्या बाहेर राहे केवड्याचा बन ।।*

*कोलू चिमन पाटील डोंगरवार*
*बांध बांधिले कवडी कवडीन ।।*
*चौदा मैलाचा घेर आहे, पाण्यात बेलोडी*
*पवनी हाती लाखाची, होती लाखाची ।।*
*या बारा गावच्या सीमा बुडाल्या तेती*
*चिमन पाटील डोंगरवार बांध बांधिला नकाशाप्रमाणं ।।*
*देव भक्ताचा कैवारी आला धावून*
*पाळीवर वडाचा झाड दिसे दुरुन ।।*
*या झाडाखाली आहे मारोती देव*
*पाळीवर कोलासूर देव पाहे दुरून ।।*
*या बारा बहिणीचा मेळ जमला फार*
*पाळीवर अखंड पाणी, मधी डोंगरी ।।*
*चिमन पाटील डोंगरवार बांधे हवेली*
*माधवराव, रामकृष्ण फिरे डोंग्यात ।।*
*हाती घेऊन बंदूक, खाकी ड्रेस*
*पृथ्वीच्या शाहीर लोकांनी लावणी जोडली*
*मंगरूजी सखाराम सभेत लावणी गाविली ।।*

नवेगांव बांध राष्ट्रीय उद्यानाची लावणी म्हणून गायल्या जाणाऱ्या या लावणीत सत्य घटनांचा उल्लेख आहे. येथे उल्लेखिलेला कोलू पाटील तसाच चिमना पाटीलही दिसतो. शिवाय माधवराव पाटील व रामकृष्ण पाटील या त्यांच्या वंशजाचाही उल्लेख ही लावणी करते. चौदा मैलाच्या घेरासह अनेक प्रकारची माहिती लावणीत सादर होताना दिसते. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून तिला अतिशय महत्त्व आहे. निसर्ग सौंदर्याचे देणे लाभलेले, विविध पशुपक्षांना आसरा देणारे नवेगांव बांध आज भारतात राष्ट्रीय उद्यान म्हणून सुपरिचित आहे. अशाप्रकारच्या विविध लावण्या दंडारीत गायिल्या जातात. प्राचीन, मध्ययुगीन, अर्वाचिन व आधुनिक कालखंडातील विविध प्रसंग व बदलत्या युगानुसार स्थितीगतीचे वर्णन करणाऱ्या लावण्या दंडारमधून सादर होत आहेत. हे दंडार लोकनाट्यातील लावण्यांचे गमक म्हणावे लागेल.

टीप : या लेखातील लावण्यांची उदा. श्री. कै. बळीराम गहाणे (पांढरवाणी) यांच्या बाडातून घेतलेली आहेत.

•••